महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १८६६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २३

# मुंबई उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटंटसंबंधी अधिनियम, १८६६

(१५ जून १९८५ पर्यंत सुधारलेला)

**THE BOMBAY HIGH COURT (LETTERS PATENT) ACT, 1866.**

**(BOMBAY XXIII OF 1866)**

**(As Modified upto 15th June 1985)**

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, वाई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, मुंबई–४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

१९८५

(किंमत – २० पैसे)

सन १८६६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २३

# मुंबई उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटंटसंबंधी अधिनियम, १८६६.

(दिनांक १५ जून १९८५ पर्यंत सुधारलेला)

## अनुक्रमणिका


पृष्ठ

उद्देशिका ... ... ... ... ... ...

कलमे

१. मुंबई उच्च न्यायालयाच्या सुधारलेल्या लेटर्स पेटंटचे कलम २२ ऐवजी दाखल केलेले कलम. ...

सन १८६६ चा मुंबई अधिनियम २३[1]

## मुंबई उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटंटसंबंधी अधिनियम, १८६६.

[१७ मे १८६६]

### मुंबई इलाख्याच्या उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटंट[2] मधील दोन लेखनदोष सुधारण्याबाबत अधिनियम

ज्याअर्थी, तारीख २८ डिसेंबर १८६५ रोजी केलेल्या, मुंबई इलाख्याच्या उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटंटचे[2] कलम बावीस पुढीलप्रमाणे आहे :—

"आणि आम्ही आणखी असा कायदा करीत आहोत की, मुंबई येथील उच्च न्यायालयास त्याच्या सामान्य मूळ दिवाणी अधिकारितेच्या स्थानिक हद्दीत सामान्य मूळ फौजदारी अधिकारिता असेल व तसेच त्यास, अशा हद्दीच्या बाहेरील अशा ज्या व्यक्तींवर बंगालमधील फोर्ट वुइल्यम येथील उक्त उच्च न्यायालयाची अधिकारिता हा लेख प्रसिद्ध झाल्याच्या तारखेस चालत असेल, त्या सर्व व्यक्तींवर तशीच अधिकारिता असेल;"

आणि ज्याअर्थी, यापूर्वी अधोरेखित केलेले दोन लेखनदोष सुधारणे इष्ट आहे;

त्याअर्थी, याअन्वये पुढील अधिनियम करण्यात आला आहे :—

मुंबई उच्च न्यायालयाच्या सुधारित लेटर्स पेटंटचे कलम २२ ऐवजी दाखल केलेले कलम.

१. वर उद्धृत केलेल्या कलमाऐवजी पुढील कलम दाखल करावे :—

"आणि आम्ही आणखी असा कायदा करीत आहोत की, मुंबई येथील उच्च न्यायालयास त्याच्या सामान्य मूळ दिवाणी अधिकारितेच्या हद्दीत, सामान्य मूळ फौजदारी अधिकारिता असेल; तसेच त्यास उक्त अशा हद्दीच्या बाहेरील ज्या व्यक्तींवर मुंबई येथील उक्त उच्च न्यायालयाची अधिकारिता हा लेख प्रसिद्ध झाल्याच्या तारखेस चालत असेल, त्या सर्व व्यक्तींवर तशीच अधिकारिता असेल."

(यथार्थ अनुवाद)

न. ब. पाटील,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.

---

[1] हा अधिनियम, परिषदेच्या एकाच बैठकीत मांडण्यात व पारित करण्यात आला. परिषदेतील या अधिनियमासंबंधीच्या कामकाजासाठी भारत सरकारचे राजपत्र १८८६, पुरवणी, पृष्ठ २९५ पहा. सन १९२१ च्या मुंबई अधिनियम २ द्वारे याला संक्षिप्त नाव देण्यात आले.

[2] सर्वसाधारण सांविधिक नियम व आदेश.